रयत शिक्षण संस्थेचे,

# सदगुरु गाडगे महाराज कॉलेज, कराड

(स्वायत्त महाविद्यालय)

## शारीरिक शिक्षण व क्रीडा विभाग

*आयोजित*

## अग्रणी महाविद्यालयांतर्गत एकदिवसीय कार्यशाळा

व्हॉलीबॉल व तायक्वाँदो खेळातील नियम आणि प्राथमिक कौश्यल्ये

# अहवाल

**दि.११-०२-२०२३**

महाविद्यालयामध्ये शारीरिक शिक्षण व क्रीडा विभागाच्यावतीने अग्रणी महाविद्यालायांतर्गत एक दिवसीय कार्यशाळेचे आयोजन दि.११फेब्रुवारी २०२३ रोजी सकाळी ९.०० वाजता करण्यात आले. या कार्याशाळेचे प्रमुख मार्गदर्शक आंतरराष्ट्रीय तायक्वाँदो कोच श्री अमोल पालेकर यांनी तायक्वाँदो खेळातून आपण आपले स्वसंरक्षण कश्या पद्धतीने करू शकतो याचे प्रात्यक्षिक विद्यार्थीनीना दाखविले तसेच हा खेळ कोणकोणत्या स्तरापर्यंत खेळला जातो .याचे नियम आणि कौश्यल्ये कोण कोणती आहेत याचे प्रात्यक्षिक दाखविले .स्पर्धा कालावधीमध्ये सामन्यादरम्यान याचे गुण कसे व किती दिले जातात याची माहिती विद्यार्थ्यांना दिली. कार्यक्रमाचे दुसरे प्रमुख मार्गदर्शक राष्ट्रीय व्हॉलीबॉल पंच श्री.अल्लाबक्ष पटेल यांनी विद्यार्थ्यांना व्हॉलीबॉल कोर्ट ची लांबी-रुंदी किती असते पंच किती असतात व पंच कार्य काय असते तसेच या खेळातील नियम व कौश्यले प्रात्यक्षिकाद्वारे विद्यार्थ्यांकडून करून घेतले .या कार्यशाळेच्या अध्यक्षस्थानी महाविद्यालयाचे उपप्राचार्य प्रा.नेताजी सूर्यवंशी हे होते. ते म्हणाले, खेळामध्ये आवड निर्माण झाली पाहिजे याकरिता असे उपक्रम महाविद्यालयामध्ये राबविले जातात विद्यार्थी खेळाडूंनी जास्तीत जास्त खेळामध्ये सहभाग घेऊन आपले व महाविद्यालयाचे नाव उज्वल करावे .विविध स्पर्धामध्ये सहभाग घेऊन यश संपादन करावे.या कार्याशाळेकरीता एकूण २३० विद्यार्थी उपस्थित होते.

कार्यक्रमाचे प्रास्ताविक व स्वागत जिमखाना विभाग प्रमुख प्रा. विद्या पाटील यांनी केले.सूत्रसंचालन प्रा.सचिन चव्हाण यांनी केले .तर आभार प्रा.सुनील कदम यांनी मानले.

विभाग प्रमुख

शारीरिक शिक्षण व क्रीडा विभाग